प्रेसनोट -

<u>कौशल्यपुर्ण तपासातुन खुनाचा गुन्हा उघड</u>

<u>भारती विद्यापीठ पोलीसांची उकृष्ठ कामगिरी</u>

दि.०२/०४/२०१८ रोजी भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीतील कात्रज देहुरोड बायपास हायवे लगत सिल्व्हर स्टार हॉटेलच्या मागील नाल्यामध्ये खुन करुन कचऱ्याच्या ढिगाऱ्याच्या खाली अर्धवट कुजलेल्या अवस्थेत एका इसमाची बॉडी मिळुन आली होती. त्याबाबत भारती विदयापीठ पोलीस ठाणे येथे भारती विदयापीठ पो.स्टे पुणे शहर गु.र.न.२१६/२०१८, भां.द.वि.कलम.३०२,२०१ प्रमाणे अज्ञात इसमाच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील मयत झालेला इसम हा नक्की कोण आहे ? व खुन कोणी केला आहे याबाबतचा शोध मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री कमलाकर ताकवले सो व पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजकुमार वाघचवरे सो यांच्या आदेशाने पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते व तपास पथकातील कर्मचारी घेत असताना भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन चे कर्मचारी पो.ना.उज्वल मोकाशी यांनी कौशल्यपुर्ण तपास करुन मयत इसम यांच्या हाताच्या वाढलेल्या नखावरुन तो नेपाळ येथुन पुण्यात मार्बल लाईन वर हमाली कामास आला असल्याची व त्याचे नाव अर्जुन डबलबहादुर भुल, वय २३ वर्षे, मुळ मुळ रा. मु पो दुरगोली चौरा बाजार जवळ, जि केलाली नेपाल अशी व पो.ना. धंनजय वणवे यांनी मयताची ओळख पटविण्यासाठी मिळविलेली माहिती अशी माहिती एकत्र करुन बॉडीची ओळख पटविली. तसेच मयत हा १५ ते २० दिवसापुर्वी एका बाधंकामावर कामास जात होता. त्यावेळी तेथील काम करणारा इसमाने त्याच्या हातातील सिल्व्हर रंगाचे ब्रेसलेट, फ्रेन्डशिप ब्रॅन्ड व त्याच्या अंगावरिल कपडे पाहुन ते अर्जुन भुल याचे असल्याचे सांगितले. त्यावेळी सदर इसमास खुन कोणी केला असेल याबाबत विविध शक्यता पडताळत असताना मयत झालेला इसम हा नेपाळ येथुन कामास पुण्यात आला होता व त्यास दारु पिण्याचे व्यसन होते हि माहिती प्राप्त झाली होती. त्यामाहितीप्रमाणे तो कोणाबरोबर दारु पिण्यासाठी बसत होता ति माहिती काढली तो नेपाळ येथील अर्जुन चौधरी याच्या बरोबर दारु पित होता. त्यावेळी अर्जुन चौधरी याचा शोध घेतला असता तो काम करत असलेल्या ओसवाल मार्बल येथे काम सोडुन निघुन गेल्याची माहिती मिळाली. त्यावेळी त्याच्यावर संशय बळवला असता त्याचा शोध घेतला १. अर्जुन भोसुर चौधरी, वय १९ वर्षे, रा. ओसवाल मार्बल, सिल्व्हर हॉटेलच्या शेजारी, आंबेगाव बु‌॥ पुणे मुळ रा. मु पो दुरगोली चौरा बाजार जवळ, जि केलाली नेपाल. व त्याच्या बरोबर असणारा २. रामकिसुन भुरहा डगवरा थारु वय-२३ वर्षे रा. पुजा मार्बल, सिल्व्हर हॉटेलच्या शेजारी, आंबेगाव बु‌॥ पुणे मुळ रा. मु पो दुरगोली चौरा बाजार जवळ, जि केलाली नेपाल यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने अर्जुन चौधरी, परशुराम चौधरी, मयत अर्जुन भुल, व रामकिसुन थारु हे दि.०१/०५/२०१८ रोजी महाराष्ट्र दिन असल्याने कामावरुन सुटट्टी होती त्यावेळी दारु पिण्यासाठी मेहम्मुद सय्यद यांच्या गॅरेज जवळ आंबेगाव बु‌॥ पुणे येथे बसले होते. रामकिसुन थारु याने अर्जुन भुल हा नेपाळ येथे राहत असताना त्याचे पत्नीबरोबर असणाऱ्या अनैतिक संबधातुन नेपाळ भांडणे झाली होती त्याचा राग मनात धरुन त्यास लाकडी बाबुने व दगड मारुन खुन केल्याचे सांगितले व त्यास कचऱ्याच्या ढिगऱ्यावर टाकुन त्याच्यावर कचरा टाकुन त्यास झाकुन टाकले असे अर्जुन चौधरी यांने सांगितले. त्यावेळी रामकिसुन भुल यांच्याकडे तपास केला असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. आरोपी यास अटक करुन मा.न्यायलयाकडुन त्याची पोलीस कस्टडी रिमांड घेतली असुन गुन्हयाचा अधिक तपास करित आहोत.

सदर कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त सो. दक्षिण प्रादेशिक विभाग रविंद्र सेनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त मा. प्रविण मुंडे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, पोलीस निरीक्षक(गुन्हे) वाघचवरे तसेच तपास पथकाचे पोलीस उपनिरिक्षक दत्ताजीराव मोहिते, कृष्णा निढाळकर, उज्वल मोकाशी, धनंजय वणवे, महेश मंडलीक, शिवदास गायकवाड यांनी केलेली आहे